महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-४०२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात दिनांक :- ३० मे, २०२४

-: शुद्धिपत्रक :-

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४
(जाहिरात क्रमांक ४१४/२०२३, दिनांक २९ डिसेंबर, २०२३)

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता दिनांक ०८ मे, २०२४ च्या शुद्धिपत्रकानुसार एकूण ५२४ रिक्त पदांचा समावेश जाहिरातीमध्ये करण्यात आला असून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. दरम्यान काही उमेदवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदी च्या आधारे इतर मागासवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करून महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ करीता इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरून शासनाने, **शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक २८ मे, २०२४** अनुसार दिलेल्या सूचना विचारात घेऊन अराखीव किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास, अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा (OBC) दावा उपलब्ध करून देण्याचा तसेच सदर प्रवर्गातून नव्याने पात्र ठरलेल्या (अराखीव करीता वयाधिक) उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा**-२०२४ दिनांक ०६ जुलै, २०२४ ऐवजी सुधारित दिनांकास म्हणजेच **दिनांक २१ जुलै, २०२४** रोजी घेण्यात येईल.

२. आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ परीक्षेकरीता मूळ जाहिरातीस अनुसरून अर्जाद्वारे फक्त अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज केलेल्या उमेदवारांना इतर मागास वर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच अराखीव (खुला) मधील उमेदवार जे मूळ जाहिरातीकरीता **वयाधिक ठरल्याने** अर्ज सादर करू शकले नाहीत, अशा इतर मागासवर्गातील उमेदवारांकरीता नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या "Question" या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) इतर मागास वर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) इतर मागास वर्गाचा विकल्प सादर केलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) चा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(४) इतर मागास वर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करण्यासाठी विहित पद्धतीने तसेच विहित कालावधीत विकल्प सादर न करणाऱ्या उमेदवारांचा प्रस्तुत पूर्व परीक्षेकरीता यापूर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरतीप्रकिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(५) इतर मागासवर्गाच्या आरक्षणामुळे मागासवर्गीयांकरीता अनुज्ञेय असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीस अनुसरून नव्याने पात्र ठरणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे इतर मागासवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

(6) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवाराने इतर मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा कालावधी	**दिनांक ३१ मे, २०२४ रोजी १४.०० ते दिनांक ७ जून, २०२४ रोजी २३:५९**
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०७ जून, २०२४ रोजी २३:५९**
३	भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक	**दिनांक ०९ जून, २०२४ रोजी २३:५९**
४	चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक १० जून, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये**

७. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता इतर मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर विकल्प सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक ०७ जून, २०२४ पर्यंतचे असणे आवश्यक आहे.

८. प्रस्तुत परीक्षेकरीता इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे(NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९. प्रस्तुत परीक्षेच्या मूळ जाहिरातीमधील एकूण १६ संवर्गासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या पात्रतेनुसार विकल्प घेण्यात आले. दिनांक ०८ मे, २०२४ रोजीच्या शुद्धीपत्रकामध्ये नवीन ६ संवर्गाचा समावेश झाल्याने मूळ जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची व तसेच शुद्धीपत्रकानुसार नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांची एकूण २२ संवर्गासाठी पात्रता (वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, दिव्यांग सुनिश्चिती इत्यादी बाबी) मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्याच्या टप्प्यावर पात्रतेनुसार विकल्प घेण्यात येईल.

१०. दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध जाहिरात तसेच दिनांक २४ जानेवारी, २०२४ व ०८ मे, २०२४ रोजी प्रसिद्ध शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग